# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी - ०२२-४३२२६८०८/८१२ ई मेल – mlwbcivil@gmail.com


जा.क्र.मका/बांधकाम/२०२२/३८ दिनांक १४/०२/२०२२

## जाहीर प्रकटन

विषय – कामांची निविदा तयार करणे, कामांवर देखरेख ठेवणे व देयके प्रमाणित करणे इत्यादी कामांसाठी वास्तुविशारद यांच्याकडून दरपत्रके मागविणेबाबत.

महोदय,

मंडळास सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्यामार्फत खालील नमूद कामे करुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया पार पाडणे, कामांवर देखरेख ठेवणे व कामाची देयके प्रमाणित करणे यासाठी नोंदणीकृत वास्तुविशारद यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**कामांचा थोडक्यात तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

**अ) कामगार कल्याण भवन, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई -**

१) भूखंडाच्या पूर्व आणि पश्चिम बाजूकडील प्रत्येकी ५०.५९ मीटर लांब आणि किमान ८ फुट उंच पत्रे लावणे.

२) सुरक्षा रक्षकांसाठी कॅबिन तयार करणे.

**ब) कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई**

१) अभ्यासिकेत असमतल झालेल्या फरशा काढून तेथे कोबा करणे.

२) अभ्यासिकेच्या आतील महिला व पुरुष प्रसाधनगृहामुळे दुर्गंधी पसरत असल्याने ती प्रसाधनगृहे काढणे व अभ्यासिकेच्या प्रसाधनगृहाचे दरवाजे बांधकाम करुन बंद करणे.

३) लॉबीतील जिन्याजवळील भिंत पाडून तेथे महिलांसाठी प्रसाधनगृह / चेंजिंग रुम तयार करणे.

४) इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारापासून जिन्यापर्यंतच्या लॉबीमधील छताची डागडुजी करुन प्लास्टर करणे व संपुर्ण लॉबीचे रंगकाम करणे.

५) अभ्यासिकेच्या वरच्या मजल्यावरील (पहिला मजला) प्रसाधनगृहातून खालच्या मजल्यात होत असलेली पाणी गळती थांबवण्यासाठी आवश्यक तेथे वॉटर प्रुफिंग करणे.

६) वरीलप्रमाणे होणाऱ्या बदलानुसार ड्रेनेज पाईपचे स्थान बदलून त्यासाठी नवीन पाईप लावणे.

७) पहिल्या मजल्यातील प्रसाधन गृहातील लीक झालेले पाईप बदलणे.

८) मैदानातील पाण्याच्या टाकीला सेंसर मशीन व बॉल कॉक लावणे व पाईप लाईनमध्ये आवश्यक ते बदल करणे.

वास्तुविशारद यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन कामाचा आवाका लक्षात घ्यावा व त्यानंतर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकासोबत जीएसटी क्रमांक व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत. मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालय, प्रभादेवी, मुंबई येथे दिनांक २१/०२/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत दरपत्रक सादर करावेत. शासकीय नियम व निकष यांच्या अधीन राहून दुरुस्ती कामे करुन घेण्याची जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील.

कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मडळ प्रशासनास राहील.

(रविराज इळवे)

कल्याण आयुक्त